# ग्रामीण स्त्रियांची सामाजिक व राजकीय सद्यस्थिती आणि आव्हानेए उपाय योजना.

प्रा. डॉ. पंढरी व्यंकटी गुट्टे
समाजशास्त्र विभाग प्रमुखए
कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय परळी वैजनाथ.

**प्रस्तावनारू**

कोणत्याही समाजाचा अभ्यास करताना आपल्याला त्या समाजातील लोकसंख्येचा विचार करावा लागतो. लोकसंख्येतील स्त्री-पुरुष आणि या घटकांचा अभ्यास त्यासाठी महत्त्वाचा असतो. ग्रामीण समुदायात स्त्री पुरुषांच्या बरोबरीने काम करत असते. समाजरूपी रथाची दोन चाके जर सक्षम असतील तर समाजरूपी परत आपली प्रगती करू शकतो. म्हणून ग्रामीण समुदायातील स्त्रियांची सद्यस्थिती कशी आहे हे समजावून घेता यावे यासाठी हा प्रयत्न केला आहे. भारतीय ग्रामीण समाज हा शहरी समुदायाच्या तुलनेत विकासामध्ये मागे असलेला दिसून येतो. याचे कारण म्हणजे ग्रामीण स्त्रियांवर लादलेले निकृष्ट प्रतीचे जीवन हे होय. पुरुष प्रधान ग्रामीण समाजात स्त्रियांना दुय्यम स्थान दिले जाते. प्राचीन काळात हिंदू धर्मात स्त्रियांना देवतेचे स्थान दिले असले तरी नंतर त्यात बदल होत गेला तिला दाशी समजण्यात येऊ लागले. ग्रामीण समुदाय आहेत याची प्रचिती येण्यास सुरुवात झाली. ग्रामीण स्त्री ही अबला आहेए तिचे कार्यक्षेत्र चूल आणि मूल इतकेच आहे असे नंतर समजण्यात येऊ लागले. भारतीय संविधानाने आज जरी तिला अधिकार दिले असले तरी ग्रामीण भागातील स्त्रियांना याची कितपत माहिती आहे हा संशोधनाचा विषय आहे. त्यामुळे ग्रामीण स्त्रियांची सामाजिक व राजकीय स्थिती कशी आहे हे समजावून घेण्याचा प्रयत्न केला आहे. याची उद्दिष्टे आहेत ती खालील प्रमाणे.

**उद्दिष्टेरू**

1द्ध ग्रामीण स्त्रियांची कौटुंबिक सामाजिक स्थिती समजून घेणे.
2द्ध ग्रामीण कुटुंबातील स्त्रियांच्या राजकीय स्थितीचे अध्ययन करणेए
3द्ध ग्रामीण स्त्रियांच्या दर्जा व अधिकाराची माहिती घेणे.

वरील उद्दिष्ट लक्षात घेऊन ग्रामीण समुदायातील स्त्रियांच्या सामाजिक व राजकीय स्थितीचे अवलोकन करून अध्ययन करण्याचा प्रयत्न केलेला आहे. भारतीय राज्यघटनेचे पंधराव्या कलमानुसार स्त्री-पुरुषांच्या भेदभाव आस बंदी घालण्यात आली. स्त्रियांना मतदानाचा अधिकार दिला असला तरी ग्रामीण भागात मतदान करण्याची जेव्हा वेळ येते तेव्हा ग्रामीण भागातील बहुतांश महिलांचे मतदान हे पुरुषांच्या माता नुसारच होते हे दिसून येते. इतकेच नाही तर पदाधिकारी असलेल्या सरपंच महिला व इतर स्थानिक स्वराज्य संस्थांतील महिलांच्या अधिकाराचा वापर त्या स्वतःच्या विचारानुसार करत नाहीत तर त्यांचे पतीच त्यांच्या अधिकाराचा वापर करताना दिसून येतात. पदाधिकारी स्त्रिया फक्त त्यांच्या स्वाक्षरी करण्यापुरताच मर्यादित असतातए असे यावरून अनेक वीरा निदर्शनास येते. म्हणून ग्रामीण स्त्रियांची राजकीय स्थिती फारशी सुधारलेली नाही असे आपणास लक्षात येते. 1955 चा हिंदू विवाह कायद्यानुसार जरी स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने घटस्पोट देणे घेणे मान्य केले असले तरी ग्रामीण भागातील स्त्रियांना घटस्फोट देण्यासाठीची समाजाची मानसिकता हिंदुधर्माचा चांगली नाही असेही अनेक वेळा दिसून येते. कारण पुरुषांच्या मागणीप्रमाणे घटस्फोट लवकर दिला जातो. तर स्त्रियांची मागणी असल्यानंतर त्याकडे दुर्लक्ष केले जातेए यावरून वैवाहिक स्थितीमध्ये ही ग्रामीण समुदायांमध्ये समाधानकारक प्रगती झालेली नाही असे म्हणता येते. 1956 च्या हिंदू विवाह वारसा कायद्यानुसार स्त्रियांना आई वडिलांच्या संपत्तीत जरी समान अधिकार मिळालेला असला तरी त्यांना यासाठी पुरुषांच्या अर्थातच पतीच्या संमतीची गरज पडते. याबाबतीत या स्वतः निर्णय घेऊ शकत नाहीत हेच यावरून स्पष्ट होते. कायद्याने कितीही जरी त्यांना स्वातंत्र्य दिले तरी त्यांची मानसिक स्थितीही पुरुषावर अवलंबून असलेले दिसून येते. म्हणून या बाबतीतही ग्रामीण समुदायामध्ये सुधारणा होणे गरजेचे आहे. 1961 च्या हुंडा प्रतिबंधक कायद्यानुसार जरी हुंडाबंदी केली असली तरी ग्रामीण भागातील स्त्रियांच्या याबाबतीत मोठ्या प्रमाणावर अज्ञान दिसून येते. ग्रामीण समुदायाच्या अनेक अटीमुळे स्त्रियांचा विवाह करताना त्यांना हुंडा द्यावाच लागतो. म्हणून अनेक प्रश्न स्त्रियांच्या विकासामध्ये अडसर करताना दिसून येतात. उदाहरणार्थ शिक्षण दिले तरी होंडा शिवाय त्यांचे लग्न होत नसेल तर शिक्षणावर कशाला खर्च करायचा अशी मानसिकता ग्रामीण समुदायातील स्त्रियांच्या शिक्षणाच्या बाबतीत ग्रामीण लोकांची झालेली दिसून येते म्हणून ग्रामीण समुदायातील स्त्रियांच्या शिक्षणाचे प्रमाण शहरी समुदायाच्या तुलनेत कमी आहे हे लक्षात येते. त्यामुळे अनेक प्रश्न निर्माण होतात. या बाबतीतही ग्रामीण समुदायातील स्त्रियांची स्थिती ही फारशी समाधानकारक नाही असेच म्हणावे लागेल. शिक्षणाच्या बाबतीत आजही ग्रामीण भागात स्त्रियांच्या संदर्भात अनास्था असलेली दिसून येते. ग्रामीण समुदायात आजही स्त्रियांना माध्यमिक व उच्च माध्यमिक पर्यंत शिक्षण देण्याचा प्रयत्न कुटुंबात असतो. स्त्रियांना पदवी व पदव्युत्तर शिक्षण देणाऱ्या कुटुंबांची संख्या ग्रामीण भागात कमी असलेली पाहायला मिळते. त्यामुळे ग्रामीण समुदायांमध्ये उच्चविद्याविभूषित स्त्रिया फारशा पाहायला मिळत नाहीत. त्यामुळे ग्रामीण समुदायातील स्त्रियांचा म्हणावा तितकासा विकास झालेला नाही असेच म्हणता येईल. अशा अज्ञानामुळे ग्रामीण भागातील स्त्रियांना आजही अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. सामाजिक व आर्थिक दुरावस्था हा त्यांच्या निरक्षरतेचा त्यांच्यावर झालेला परिणाम आहे हे आपल्या लक्षात येते.

स्त्रियांवरील अत्याचाराचे प्रमाण ग्रामीण समुदायात आज जरी कमी झालेले असले तरी शहरी स्त्रिया व ग्रामीण पुरुष यांच्या तुलनेत ते नक्कीच जास्त आहे असे पाहायला मिळते. आज स्त्रियांना जिवंत जाळण्याचा प्रयत्न अनेक नराधम करताना दिसून येऊ लागतातए हे कशाचे निदर्शक आहे हे समजावून घेणे आवश्यकता आहे. ग्रामीण स्त्रियांना पिण्याचे पाणी इंधन यासाठी कष्ट सोसावे लागतात. शेतावर शेतमजुरी करूनही त्यांना खूप पुरेसा रोजगार मिळत नाही. ज्या स्त्रियांच्या नावावर जमीन नाही व ज्यांना टाकून दिलेले आहे अशा ग्रामीण स्त्रियांना अनेक वेळा पुरुषांच्या त्रासाला बळी पडावे लागते. ग्रामीण भागात आजही जातीयतेचे चटके स्त्रियांना सोसावे लागतात. ग्रामीण भागातील अस्पृश्य स्त्रीयांना तेथील प्रबळ जातीतील पुरुषांकडून अनेक वेळा अन्यायाचा सामना करावा लागतो. त्याची वाच्यता केली तर आपली अब्रू जाईल व रोजगार मिळणार नाही याची भीती त्यांना वाटत असते. तसेच अज्ञानाचा फायदा घेऊन अनेक वेळा त्यांच्यावर अत्याचार केले जातात. आरोग्यम् धनसंपदा असे जरी आयुर्वेदाने सांगितले असले तरी ग्रामीण भागातील स्त्रिया स्वतःच्या ज्ञानामुळे व आर्थिक स्थिती कमकुवत असल्यामुळे आपल्या आरोग्याकडे फारशी लक्ष देऊ शकत नाहीत. शासनाच्या अनेक आरोग्यविषयक जरी सुविधा असल्या तरी यांची माहिती त्यांच्यापर्यंत पोहोचत नाही म्हणून त्या आरोग्यविषयक स्थिती कमकुवत असतात. वेळेवर जेवण न करणेए जीवनसत्त्वयुक्त आहाराचा अभावए औषधोपचाराचा अभावए आरोग्यविषयक अज्ञान इत्यादीमुळे त्यांचे आरोग्यविषयक स्थिती चांगली असत नाही. आर्थिक स्थिती कमकुवत असल्यामुळे त्या दवाखाना जवळ करण्याऐवजी मांत्रिकाकडे आजही जाताना दिसून येऊ लागतात. त्यामुळे साध्या आजाराचे गंभीर आजारात रूपांतर होताना दिसून येते. ॲनिमिया सारखे आजार सतत त्यांना भेडसावतात व त्यामुळे त्यांचा मृत्यू होताना दिसून येतो. ग्रामीण स्त्रियांना काम जास्त करावी लागते परंतु त्यांचा कामाचा मोबदला मात्र त्यांना पुरेशा प्रमाणात मिळत नाही. जो काही मोबदला मिळतो त्यावर त्यांच्या कुटुंबातील पुरुषांचे लक्ष असते. मिळालेला मोबदला त्या आपल्या पुरुषांच्या हाती जमा करतात. जर पुरुष चांगले असतील तर त्यांच्या त्या मोबदल्याचा योग्य उपयोग आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह भागवण्यासाठी करतात परंतु जर त्यांना काही व्यसन असेल तर त्या कष्टाच्या मोबदल्याचा उपयोग आपल्या प्रश्नांची पूर्तता करण्यासाठी करताना दिसून येऊ लागतात अशीही अनेक वेळा निदर्शनास आलेले आहे. म्हणून ग्रामीण कुटुंबात स्त्रियांची आर्थिक स्थिती फारशी समाधानकारक नाही असे म्हणता येईल. ग्रामीण भागातील स्त्री यांना वैवाहिक बाबतीत आजही निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य पुरुषाप्रमाणे नाही. पुरुष स्वतःच्या मर्जीप्रमाणे विवाह करू शकतो परंतु स्त्रियांना पुरुषांच्या मर्जीप्रमाणे विवाह करावे लागतात. याबाबतीत ग्रामीण समुदायात आजही फारशी सुधारणा झालेली नाही हे आपल्या लक्षात येते. पूर्वीच्या तुलनेत जरी याबाबतीत सुधारणा झाली असली तरी त्या बाबतीत अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. ग्रामीण भागातील स्त्रिया जरी बचत गट चळवळीत सहभागी झाले असले तरी त्यांच्या अज्ञानाचा फायदा पुरुष घेताना दिसून येऊ लागतात. बचत गटाच्या माध्यमातून जो आर्थिक फायदा त्यांना मिळतो त्यावर पुरुष आपले अधिकार गाजवताना दिसून येतात. त्यांना जर विरोध केला तर कुटुंबात अनेक वेळा त्यांना त्रासाला सामोरे जावे लागते. त्यातून केलेला उद्योगाच्या मिळकतीवरए व बँकांच्या कर्जावर हे पुरुष अधिकार सांगताना दिसून येऊ लागतात. यावरून अनेक वेळा कुटुंबांमध्ये पती आणि पत्नी यांच्यामध्ये वाद झालेले पाहायला मिळतात. म्हणजेच ग्रामीण स्त्रियांच्या आर्थिक मिळकतीत पुरुषाचा हस्तक्षेप हा वाढलेला आहे असे आपल्या लक्षात येते. ग्रामीण भागातील कुटुंबात आजही मुलगा आणि मुलगी असा भेदभाव पाहायला मिळतो. जन्मए शिक्षणए विवाहए खानपान इत्यादींचा जेव्हा प्रश्न येतो तेव्हा याची आपल्याला प्रचिती येते. ज्या कुटुंबामध्ये निरक्षरता आहे तेथे हे प्रश्न मोठ्या प्रमाणात निर्माण झालेली दिसून येतात. म्हणून स्त्रियांची ग्रामीण भागात आजही फारशी स्थिती समाधानकारक आहे असे म्हणता येत नाही. पूर्वीच्या तुलनेत आज ग्रामीण भागातील स्त्रियांची स्थिती झाली जरी सुधारलेली आपल्याला पाहायला मिळत असले तरी त्यांच्या जीवनात अनेक नवीन समस्या ही तितक्याच निर्माण झालेल्या पाहायला मिळतात. ज्या उच्च जाती आहेत त्या कुटुंबातील स्त्रियांची स्थिती ग्रामीण भागात थोड्याफार प्रमाणात सुधारलेली पाहायला मिळते. परंतु आजही कनिष्ठ जातीच्या कुटुंबातील स्त्रियांची कौटुंबिकए सामाजिकए आर्थिकए वैवाहिकए राजकीय स्थिती पूर्वीच्या तुलनेत जरी असली तरी शहरातील स्त्री-पुरुष व ग्रामीण भागातील पुरुषांच्या तुलनेत नक्कीच ती चांगली नाही असे आपल्या लक्षात आल्याशिवाय राहत नाही. ही स्थिती जर आपल्याला बदलवायची असेल तर त्यासाठी खालील उपाय योजना कराव्या लागतील.

**उपाय योजना**:

1द्व ग्रामीण स्त्रियांना कुटुंबातील स्थान मुलांच्या बरोबरीने देण्यासाठी कुटुंबातील मानसिकता बदलणे. यासाठी शासनस्तरावरून स्वयंसेवी संस्था करवी मदत करणे.

2द्व ग्रामीण कुटुंबातील स्त्रियांच्या विवाहाचे वय 18 वरून 21 असे करणे. ज्यामुळे स्त्रियांचे विवाहाचे वय वाढत जाईल व आपोआपच त्यांच्या शिक्षणाचे प्रमाण वाढेल जेणेकरून उच्चशिक्षण घेणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण जास्त होईल.

3द्व ग्रामीण स्त्रियांना राजकीय प्रक्रियेमध्ये सहभागी करून घेण्यासाठी शिक्षणाची आठ घालने.

4द्व स्त्री पदाधिकाऱ्यांच्या कार्यातील पुरुषांचा राजकीय हस्तक्षेप कमी करणे. त्यासाठी स्त्रिया करत असलेल्या राजकीय कारभारासाठी त्यांना प्रशिक्षित करणे.

5द्व ग्रामीण समुदायातील स्त्रियांना समाजात मानाचे स्थान मिळावे यासाठी कौटुंबिक पातळीपासून प्रयत्न होणे कसे गरजेचे आहे हे शासनाच्या विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचवणे. ग्रामीण स्त्रियांपुढे जरी विविध प्रश्न आणि आव्हाने सध्या स्थितीत असली तरी कौटुंबिक पातळी वरून त्यांची स्थिती सुधारण्याचा प्रयत्न जर प्रत्येकाने केला तर त्यांची स्थिती नक्की सुधारेल. यासाठी शासन आणि स्वयंसेवी संस्थांनी ही आपल्याला विविध योजनांची अंमलबजावणी सक्षम पणे करण्यासाठी कठोर कायद्याची आवश्यकता आहे. त्यासाठी शासनस्तरावरून पावले उचलणे ही तितकेच गरजेचे आहे असे वाटते.

**संदर्भ**:
1द्ध भारतीय सामाजिक संरचनाए डॉ. देशपांडे / प्रा.बर्दापूरकर
2द्ध भारतीय समाज प्रश्न आणि समस्याए डॉ. सुधा काळदाते.
3द्धसामाजिक परिवर्तन आणि सामाजिक चळवळीए यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ नाशिक.